


माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

स्थापना २००२

www.mandootexpress.com

email- mandootexpress5@gmail.com

संपादक–मोहन मस्के मो.९८५०४०३७७३

■ सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली ■




वर्ष–२४ वे | अंक –१३८ | पृष्ठे–४ | मूल्य – १ रुपये | रविवार दि.८ मार्च २०२६ | R.N.I. NO. MAHMAR/2002/10619




## सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनानिमित्त विविध उपक्रम उत्साहात संपन्न; २०० महिलांची रक्त तपासणी

सांगोला(प्रतिनिधी):– जागतिक महिला दिनानिमित्त प्रभाग क्र. ४ च्या नूतन नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या संकल्पनेतून महिलांच्या आरोग्य जनजागृती व सक्षमीकरणासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे तसेच त्यांना स्वावलंबनाच्या दिशेने प्रोत्साहन देणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे उपक्रम राबविण्यात आले. हे सर्व उपक्रम उत्साहात व मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.

सांगोला येथील सनगर गल्लीतील समाज मंदिर येथे आयोजित मोफत रक्त तपासणी शिबिरामध्ये परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. शिबिरात सीबीसी (हेमोग्राम), टी३, टी४, टीएसएच (थायरॉईड) तसेच एचबीए१सी (साखर) या महत्त्वाच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या. या शिबिरामध्ये एकूण २०० महिलांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान महिलांना आरोग्याविषयी आवश्यक मार्गदर्शनही करण्यात आले.

यासोबतच वज्राबाद पेठ परिसरात महिलांसाठी मोफत प्रशिक्षण उपक्रमही आयोजित करण्यात आला. महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षणामध्ये बेसिक टेलरिंग, ॲडव्हान्स टेलरिंग, मेकअप, मेहेंदी डिझाईन यासारख्या कौशल्यांचे मार्गदर्शन देण्यात आले. तसेच आयुष्यमान भारत कार्ड व ई–श्रम कार्ड नोंदणीबाबत माहिती व मार्गदर्शन करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबतही महिलांना समजावून सांगण्यात आले.

नुकत्याच नगरसेविका म्हणून निवड झाल्यानंतर सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांनी आपल्या प्रभागातील नागरिकांच्या आरोग्य व कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प केला असून त्याचाच एक भाग म्हणून महिला दिनानिमित्त हे उपक्रम आयोजित करण्यात आले. महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच त्यांना



रोजगाराभिमुख कौशल्ये मिळावीत, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू असल्याचेही त्यांनी सांगितले.

या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी मा.सोमेश यालवकर मित्रपरिवारांच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. महिलांच्या आरोग्य व सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमांबद्दल परिसरातील महिलांकडून नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

## सांगोला येथे जागतिक महिला दिनानिमित्त कर्तबगार महिलांचा गौरव व सन्मान सोहळा

सांगोला(प्रतिनिधी):– जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीच्या सामर्थ्याचा, कर्तृत्वाचा आणि प्रेरणादायी प्रवासाचा गौरव करण्यासाठी सांगोला येथे कर्तबगार महिलांचा सन्मान सोहळा व महिलांसाठी आरोग्यविषयक समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नगरसेविका मा. तनुजा बाळासाहेब एरंडे–पाटील यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम रविवारी दि. ८ मार्च रोजी दुपारी ३ वाजता कविराज मंगल कार्यालय, महूद रोड, सांगोला येथे आयोजित करण्यात आलेला आहे.



कार्यक्रमात 'मातृत्व ते नेतृत्व' असा स्त्रीच्या प्रवासाचा सन्मान करत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने गर्भाशयाचा कर्करोग व मासिक पाळी यासंदर्भात तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सौ. संजिवनी केळकर, बाळुताई भागवत (तहसीलदार सांगोला), डॉ. सौ. प्रज्ञा लवटे, डॉ. सौ. मेघना देवकते, डॉ. सौ. स्वाती खंडागळे व डॉ. सौ. किरण मस्के उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा सन्मान करण्यात येणार असून, यामध्ये सर्व नूतन नगरसेविका सौ. राणीताई माने, सौ. छाया मेटकरी, सौ. सुजाता केदार, सौ. गोदाबाई बनसोडे, सौ. वैशाली सावंत, सौ. शोभा फुले, सौ. श्रद्धा साबळे, सौ. सोनाली पाटील, सौ. आशादेवी यावलकर, सौ. सिमा सरगर, सौ. अनिता केदार, सौ. वैशाली झपके, सौ.दिव्यांनी दौंडे तसेच सौ. शोभा खटकाळे, सौ. राणी पाटील, सौ. वंदना शेळके, सौ. सिंधुताई आलदर, सौ. सुवर्णा नवले, सौ. संगिता मोटे, सौ. स्मिता गोडसे, सौ. पुनम इंगवले, सौ. छाया कोळेकर व सौ. काजल काशिद जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाध्ये सांगोला सांगोला एसटी आगारा मध्ये कंडक्टर म्हणून सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात येणार आहे.

सांगोला तालुक्यातून अनेक नामांकित, विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला उपस्थित राहणार आहेत. तसेच विविध क्षेत्रात प्राविण्य मिळालेल्या महिलांना सन्मानित करण्यात येणार आहे. तरी मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक नगरसेविका तनुजा एरंडे–पाटील यांनी केले आहे.

> आज महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. गल्लीपासून दिल्लीपर्यंत महिलांनी आपले कर्तृत्व विविध क्षेत्रात सिद्ध केले आहे. अशा कर्तबगार महिलांच्या पाठीवर थोडीशी कौतुकाची थाप देऊन त्यांना त्यांच्या कार्यासाठी अधिक बळ मिळावे, या उद्देशाने हा छोटासा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी सांगोला तालुक्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.
>
> **तनुजा एरंडे पाटील, नगरसेविका, सांगोला नगरपरिषद.**



## महिम शाळेचे एन.एम.एम.एस परीक्षेत घवघवीत यश

सांगोला(प्रतिनिधी):–राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महिम शाळेतील विद्यार्थ्यांनी यांनी यश संपादन केले.

यामध्ये साक्षी दत्तात्रय घोगरे १४१ गुण, वृषाली तानाजी कारंडे १०२ गुण, दीक्षा नवनाथ बंडगर १०१ गुण, कल्याणी बाबासाहेब कारंडे ९६ गुण, शरयू संतोष कारंडे ८७ गुण, वेदिका गौतम काटे ८४ गुण, प्रेरणा हनुमंत घोगरे ७९ गुण, आर्या महादेव शेंडगे ७८ गुण, जान्हवी महापुरे ६९ गुण, श्रेया साहेब कांबळे ६९ गुण यांनी यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थीनींचा शिक्षण विस्तार अधिकारी कुमठेकर यांनी सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक संजयकुमार राऊत, विमल उरवणे, सुधीर वसेकर, शुभदा शिपटे यांचे मार्गदर्शन लाभले.पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, मुख्याध्यापक रविंद्र पाटील, महिम ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, सर्व ग्रामस्थ व पालक तसेच शाळेतील शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सीए अंतिम परीक्षेत उत्कर्ष बनकर यांचे यश; आज भव्य सत्कार समारंभाचे आयोजन

सांगोला : सांगोला शहरातील नामांकित चार्टर्ड अकाउंटंट सीए. उत्तम डी. बनकर यांचे सुपुत्र श्री. उत्कर्ष उत्तम बनकर यांनी सन २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या चार्टर्ड अकाउंटन्सीच्या अंतिम परीक्षेत यश मिळवत उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

उत्कर्ष बनकर यांच्या या यशाबद्दल क्रांती ज्योती परिवार, माऊली प्रतिष्ठान, सर्व बनकरवाडी ग्रामस्थ तसेच सांगोला आर. ए. बनकर मित्र परिवार यांच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सत्कार समारंभ रविवार, दिनांक ८ मार्च रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमात आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते उत्कर्ष बनकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

उत्कर्ष बनकर यांच्या या यशामुळे बनकर कुटुंबासह सांगोला शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून सत्कार समारंभ कार्यक्रम मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आर. ए. बनकर मित्र परिवार यांचे कडून करण्यात आले आहे.



# नव्या समस्येचे आव्हान...

आपल्या देशात प्रत्येकवेळी नव्या नव्या सामाजिक समस्या उद्‌भवत आहेत. सोशल इश्यू हे देशाला परिणामकारक ठरतात.चांगले नव्हे तर दुष्परिणामच. आज मुलगा आणि मुलगी यांच्यातील जन्मदराचा रेषो अजूनही विषमतेतच आहे.युवक-युवतींमध्ये बरोजगारीचा भस्मासूर आहे.त्यातच तरूणांचे लग्न वेळेवर होत नाहीत.तेव्हा वयाचे अंतर न पाहाता लग्ने ठरवली जात आहेत.आज मुलांपेक्षा मुलींच्या अपेक्षा वाढत चालल्या आहेत.त्यामुळे मुलींचेही लग्ने निसर्ग नियमाच्या आत होत नाहीत. हे सारे प्रश्न डोळ्यापुढे उभे असतानाच अजून एक नवी गंभीर समस्या पुढे आली आहे ते म्हणजे लग्न झालेल्या जोडप्यांमध्ये मूल न होवू देण्याची मानसिकता वाढत चालली आहे. आज मूल जन्माला घालणे, त्यांचे संगोपन करणे म्हणजे केवळ प्रेम आणि काळजीचा भाग राहिलेले नाही. त्यासाठी जोडपी आता स्मार्ट प्लॅनिंग आणि बजेटिंगकडे लक्ष देतात. बाळ जन्माला येण्यापूर्वीच आई-बाबा आपल्या मुलाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी त्यांच्या दैनंदिन बचतीचा विचार करू लागतात. मुलांना लहानाचे मोठे करून स्वावलंबी करण्याचा खर्च जसा वाढत चालला आहे,तशी अनेक जोडपी पालकत्वाच्या निर्णयाबद्दल विचार करू लागले आहेत,असा अनुमान समोर आला आहे. त्यामुळे डिंक कपल अर्थात डबल इनकम आणि नो अपत्य ही जीवनशैली आज अनेक जण स्वीकारताना दिसत आहेत. एकेकाळी प्रामुख्याने पाश्चात्य मानली जाणारी 'डिंक' ही संकल्पना आता भारतातही रूजू लागली आहे. तसेच, मुले न होऊ देण्याचा निर्णय घेणाऱ्या जोडप्यांची संख्या भारतातही वाढत आहे. या बदलामागे आर्थिक वास्तव, भावनिक विचार, पर्यावरणीय चिंता आदी अनेक कारणे असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अनेकांकडून मुले न होण्याचा निर्णय जगातील कठोर वास्तवामुळे घेतला जातो. उद्योजक निमिष रस्तोगी हे सांगतात की, हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत चालली आहे.'' दिल्लीत काम करणाऱ्या एका व्हिडीओ जर्नलिस्टनेही अशाच चिंता व्यक्त केल्या. ते म्हणाले, नैसर्गिक संसाधने कमी होत आहेत. प्रत्येक गोष्ट महाग होत जाणार आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये प्रदूषणामुळे अनेक महिने आपण नीट श्वासही घेऊ शकत नाही, अशी स्थिती आणि उरलेला काळ उष्णतेने त्रासलेलो असतो. अशा जगात तुम्ही मुलाचे संगोपन कसे करणार? नोकरी करणाऱ्या अनेक जोडप्यांना मुलाचे संगोपन करणे ही एक अशक्यप्राय बाब वाटते. निमिष रस्तोगी सांगतात, ''काम, घर आणि मूल यांच्यात समतोल साधणे अवघड आहे. आपल्या स्वतःच्या आवडी-निवडी आणि जीवनशैली यांच्याशी फारशी तडजोड न करता, जीवनातील सगळ्या गोष्टींचा आनंद घेण्यासाठी तुम्हाला आर्थिक सुबत्तेची गरज असते. माध्यम व्यावसायिक अनुराग कुमार सांगतात की, वेळेचा अभाव आणि कामाचा ताण यांमुळेही हा निर्णय घेतला जातो. कारण- घर सांभाळून दैनंदिन कामे करणं हे आधीच आव्हानात्मक ठरत आहे. अनेकांना कुटुंबाच्या भक्कम पाठिंब्याशिवाय मुलाचे संगोपन करणे खूप कठीण वाटते. अनुराग कुमार सांगतात, ''जोपर्यंत कुटुंबाचा खंबीर पाठिंबा मिळत नाही, तोपर्यंत मुलाला एकट्याने वाढवणे अशक्य वाटते.'' तर, काहींना सततच्या देखरेखीचा कंटाळा येतो. ''कोणीतरी सतत माझ्या कामात डोकावणे माझ्या मानसिक आरोग्यासाठी चांगले नाही,'' असेही अनेकांचे मत आहे. ही संकल्पना त्यांच्या सध्याच्या जगण्याशी जुळणारी नाही. अनेक जोडप्यांसाठी वैयक्तिक स्वातंत्र्य आणि जीवनशैली यांचा समतोल राखणे ही मुले न होण्याच्या निर्णयातील महत्वाची भूमिका आहे. ''आम्हाला आमचे स्वातंत्र्य मनापासून आवडते. सध्या ही जीवनशैली आम्हाला समाधानकारक आणि संतुलित वाटते,अशी नव्या दाम्पत्यांची मानसिकता दिसून येते. मुले न होण्याचा निर्णय घेण्यामागे व्यावहारिक कारणेही वाढत आहेत. मुलांचे संगोपन, शाळा, आरोग्य सेवा आणि घरांच्या वाढत्या किमतींकडे दुर्लक्ष करणेही कठीण झाले आहे. दिल्लीतील एका व्हिडीओ जर्नलिस्टने सांगितले, ''मी एका कॅथॉलिक कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिकलो आणि माझी क्वार्टरली ट्यूशन फी १८०० रुपये होती. आज १८०० रुपयांत काय मिळते? कोविड-१९ दरम्यान माझी नोकरी गेली होती आणि त्यानंतर चार महिने मी नोकरीशिवाय होतो. विचार करा- जर तेव्हा माझे मूल शाळेत असते, तर तो काळ किती कठीण गेला असता. मूल जन्माला आल्यापासून ते २१ वर्षांचे होईपर्यंतच्या संगोपनासाठी अंदाजे खर्च ७४.३ लाख रुपये येतो आणि विशेष बाब म्हणजे त्यात महागाईचा विचार केला गेलेला नाही. तीन टक्के वार्षिक महागाई दर गृहीत धरल्यास हा एकूण खर्च अंदाजे १.१६ कोटी रुपये होतो. सहा टक्के महागाई दर असल्यास हा आकडा आणखी वाढून १.८३ कोटी रुपयांपर्यंत पोहोचतो,असे तज्ञांचे गणित आहे. एका सरकारी अधिकाऱ्याने सांगितले, मी माझ्या मुलीसाठी स्वेच्छा भविष्य निर्वाह निधी सुरू केला आहे, जेणेकरून तिचे उच्च शिक्षण, नवीन कौशल्ये किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी पुरेसे पैसे जमा होतील. हे निर्णय केवळ मोठ्या रकमेपुरते मर्यादित नाहीत. त्यांच्या दैनंदिन खर्चावरही परिणाम होतो. सध्याच्या गरजा आणि भविष्य यांचा समतोल राखण्यासाठी शिक्षण, घर, मनोरंजन, कपडे, अन्न व आरोग्यापर्यंत प्रत्येक खर्चाचा विचार करावा लागतो. पालकत्वाचा भाग म्हणून अनेकदा स्वतःच्या सुखाचा त्याग करावा लागतो. एका पालकाने सांगितले, ''जेव्हा तुम्हाला माहीत असते की, तुमच्या मुलाला अभ्यासासाठी लॅपटॉपची गरज आहे, तेव्हा तुम्हाला आवश्यक असलेल्या गोष्टी मागे ठेवून त्या गरजेला प्राधान्य द्यावे लागते. मुलाच्या संगोपनाच्या एकूण खर्चापैकी निम्म्याहून अधिक खर्च केवळ शिक्षणावर होतो. एकूण खर्चाच्या किमान ५९ टक्के वाटा शिक्षणाचा असतो. शाळा प्रवेश, वार्षिक फी, गणवेश, पुस्तके, खासगी कोचिंग हे खर्च वाढतच जातात. संगोपनाच्या खर्चाच्या सुमारे १० टक्के वाटा घरासाठी जातो. कारण- अनेक पालक मोठ्या आणि सुरक्षित घरांमध्ये राहणे पसंत करतात. भारतात आजही सर्वाधिक विद्यार्थी (५५.९%) सरकारी शाळांमध्ये शिकतात; मात्र खर्चात मोठी तफावत आहे.एकूणच हे निष्कर्ष पाहाता समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येते.सामाजिक स्तरावर अजून तरी हा विषय आलेला नाही.लग्नानंतर एक किंवा दोन अपत्य जन्माला घालणे,त्यांचे पालनपोषण करून त्यांना मोठे करणे हा निसर्ग नियम आहे.वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी चीनमध्ये कधीकाळी एकच अपत्य हा कायदा केला गेला.आज त्याचे परिणाम तो भोगत आहे.आज तिथे काम करायला तरूणवर्ग नाहीय.तिथे उलटी स्थिती निर्माण झाली आहे.दोन-तीन अपत्ये जन्माला घालण्याचे आवाहन सरकारी पातळीवर केले जात आहे. भारतात आज नाही भविष्यात अपत्ये जन्माला न घालणयची प्रवृत्ती देशाला घातक ठरणार आहे.जनजागृतीतून हा प्रश्न मिटणार नाही तर प्रवृत्ती नाहीशी करण्याची गरज आहे.

माणदूत एक्सप्रेस हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक मोहन शंकर मस्के यांनी भास्कर प्रिटींग प्रेस प्रा.लि. रामदेव वेअर हाऊस, हैद्राबाद रोड, सोलापूर (महाराष्ट्र) येथे छापून १०३२/२ ब लोहार गल्ली, सांगोला ता.सांगोला जि.सोलापूर पि.नं.४१३३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले.
माणदूत एक्सप्रेस
EMail: mandootexpress5@gmail.com
दै.माणदूत एक्सप्रेसमधील प्रसिध्द होणाऱ्या बातम्या, जाहीराती व लेखातील मजकूरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# प्रसिद्धी पासून कोसो दूर असणारे व्यक्तिमत्व म्हणजे भाई.विठ्ठलराव शिंदे सर



मागील सात दशकापासून प्रसिद्धीपासून कोसो दूर असणारे व्यक्तिमत्व, सांगोला तालुक्यातील व परिसरातील शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य जनतेचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते स्व.आम.डॉ. भाई गणपतराव देशमुख यांच्या खांद्याला खांदा लावून प्रामाणिकपणे व एकनिष्ठ राहून साथ देणारे, मागील वीस वर्षापासून शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस म्हणून काम पाहिलेले, तालुक्यातील व परिसरातील शैक्षणिक उन्नतीसाठी सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला या शैक्षणिक संस्थेचे उत्तमरीत्या सचिव पद सांभाळणारे, स्व. आबासाहेबांनंतरची जेष्ठ मार्गदर्शकाची भूमिका बजावणारे विश्वस्त मा.भाई विठ्ठलराव शिंदे सर होय.

यांच्या शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत रिजनल टीचर्स असोसिएशन दापोली या राष्ट्रीय सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा यावर्षीचा आदर्श शिक्षण व समाजसेवक पुरस्कार २०२५ या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

स्व.आबासाहेबांच्या बरोबर अनेक चळवळी व आंदोलनामध्ये गेली ५५ वर्ष अविरतपणे सक्रियरित्या सहभागामुळे समाजसेवेची संधी मिळाली व ती यशस्वीरित्या पार पाडली. दुष्काळी परिस्थितीमध्ये तालुक्यात, गावोगावी पाण्याच्या व चाऱ्याच्या अभावी ज्या चारा छावण्या उभारल्या गेल्या, त्या चारा छावण्यातील शेतकऱ्यांना स्व. आमदार गणपतराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली त्या काळामध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून अडचणी सोडवण्याचे काम त्यांनी केले व साहजिकच शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला. विशेषता अकोला गावातील पशुधन वाचवण्यासाठी चारा छावणीची उभारणी करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे चाऱ्यांचे व पाण्याचे प्रश्न सोडवले.

या व यापूर्वीच्या सर्व सामाजिक कार्याची दखल घेऊन स्व. आबासाहेबांनी त्यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस पदाची धुरा सांभाळण्यास दिली व त्यांनी ती यशस्वीरित्या पार पाडली. मा. विठ्ठलराव शिंदे सर यांचा दूरदर्शी शैक्षणिक दृष्टिकोन विचारात घेऊन त्यांच्याकडे सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला या शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेपासून संस्था सदस्य व १९९५ पासून संस्था-सचिव पदाची जबाबदारी सोपवण्यात आली व ती आत्तापर्यंत यशस्वीरित्या पार पाडत आहेत. २०१० साली त्या परिसरातील पालकांची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन जि.प.प्रा. शाळा शिंदे- गव्हाणे वस्ती या प्राथमिक शाळा उभारणीसाठी स्वतःच्या मालकीची शाळेसाठी पाच गुंठे जमीन देऊन त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

अकोला गावातील महिलांची गरज लक्षात घेऊन २०२० साली जोगेश्वरी महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित अकोला. येथे तीनशे महिला सभासद असुन त्या महिलांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन या महिला पतसंस्थेची उभारणी करण्यात आली. या पतसंस्थेमार्फत गरजू, विश्वासू, होतकरू, महिलांना लघुउद्योग उभारणीसाठी आर्थिक सहाय्य केल्यामुळे त्यांचे प्रपंच सुधारण्यासाठी मदत होते.

नीट, जेईई व एम एच टी सी इ टी या परीक्षांच्या तयारीसाठी जो क्रॅश कोर्स राबविला जातो त्यासाठी तालुक्यातील व परिसरातील विद्यार्थ्यांना भरमसाठ फी देऊन परगावी जावे लागत होते, सर्वसामान्य गरीब गरजू पालकांना ते शक्य नव्हते, म्हणून स्वर्गीय आबासाहेबांच्या प्रेरणेने व संस्था सचिव मा. विठ्ठलराव शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली

**सांगोला तालुक्यातील पहिला क्रॅश कोर्स**

१५ मार्च ते ०१ मे २०१६ या कालावधीत राबविण्यात आला, व तेव्हापासून हा क्रॅश कोर्स आजही यशस्वीरित्या सुरू आहे. या क्रॅश कोर्समुळे शेतकरी,कष्टकरी, सर्वसामान्य, गरीब कुटुंबातील पालकांच्या मुला मुलींना आर्थिकदृष्ट्या सहकार्य लाभले. . या क्रॅश कोर्सच्या उत्तम निकालामुळे तालुक्यातील व परिसरातील विद्यार्थ्यांना याचा फायदा होत आहे.

अशाप्रकारे तालुक्यातील सर्वसामान्य कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांना अल्प फी मध्ये उच्च शिक्षण मिळावे, या उद्देशाने नेहमीच कार्यतत्पर राहिलेले व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय भाई विठ्ठलराव शिंदे सर उर्फ नाना होय. एवढेच नव्हे तर, सांगोला तालुक्यातील बहुतांश शैक्षणिक संस्थांना नेहमी योग्य सल्ला व मार्गदर्शन करत असतात. सामाजिक व शैक्षणिक उन्नती हाच आबासाहेबांचा पुरोगामी विचार व वारसा येणाऱ्या पिढीमध्ये संक्रमित करण्यासाठी सदैव कार्यरत राहून युवा पिढी, शिक्षक व सर्व सेवक यांना नेहमी मार्गदर्शकाची व कुटुंबप्रमुखाची भूमिका बजावणारे, स्व. आबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून सांगोला तालुका व परिसरातील सुसंस्कृत समाज निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे आदरणीय भाई विठ्ठलराव शिंदे सर उर्फ नाना यांना आज त्यांच्या जन्मदिनी खुप शुभेच्छा

**डॉ.सिकंदर मुलाणी,**
**प्राचार्य,डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला**


# सांगोला महाविद्यालयाला 'सृजनरंग' स्पर्धेत घवघवीत यश

सांगोला(प्रतिनिधी):-सोलापूर विद्यापीठ आयोजित 'सृजनरंग' वार्षिक नियतकालिका स्पर्धेत सांगोला महाविद्यालय, सांगोला यांच्या 'माणदेश' या वार्षिक नियतकालिकेला यावर्षीही उल्लेखनीय यश मिळाले आहे. प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयाने 'माणदेश' नियतकालिका स्पर्धेसाठी सादर केली होती. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध साहित्यप्रकारांत पारितोषिके पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.स्पर्धेतील पारितोषिक विजेते विद्यार्थी पुढीलप्रमाणे -स्नेहल काशीद - मराठी विभाग- वैचारिक लेखन, साक्षी बाबर - हिंदी विभाग- नाट्यात्मक लेखन, नूर बागवान - हिंदी विभाग- ललित गद्य लेखन, पौर्णिमा नापिक - कन्नड विभाग- वैचारिक लेखन


या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या साहित्य परंपरेला नवे बळ मिळाले आहे.संस्थेचे अध्यक्ष श्री. बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष श्री. तात्यासाहेब केदार, प्रा. प्रबुध्दचंद्र झपके, खजिनदार श्री. नागेश गुळमिर,सचिव ॲड.उदय घोंगडे, सहसचिव श्री. साहेबराव ढेकळे संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांचे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

'माणदेश' या वार्षिक नियतकालिकाचे संपादक प्रा. डॉ. अमोल पवार तसेच सहसंपादक प्रा. डॉ. बी. एस. गायकवाड, प्रा. डॉ. व्ही. एस. कांबळे, प्रा. डॉ. एम.ए. जगताप, प्रा. डॉ. आर. जी. खानापुरे, प्रा. डॉ. जे.एम. तांबोळी, प्रा. एन.जी. पाटील, प्रा.कु.पी.व्ही. काटे, प्रा. व्ही.व्ही. कुलकर्णी, प्रा.कु. पी.एन.लामगुंडे, प्रा.कु. टी.के.मिसाळ यांनी नियतकालिकाचे कामकाज पाहिले.या यशाबद्दल संस्थाचालक, प्राध्यापकवर्ग, प्रशासकीय कर्मचारी यांचेतर्फे विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

कामगार पाहिजे
* लोडर- ४ जागा * सेल्समन- ३ जागा
* ड्रायव्हर- ३ जागा
समक्ष भेटा
माऊली एजन्सी मिरज रोड, सांगोला ९२२५८०४७९२
आकर्षक पगार मिळेल




# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त वेशभूषा व ग्रुप डान्स स्पर्धांचे आयोजन



सांगोला (प्रतिनिधी): आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला पतंजली योग समिती, सांगोला आणि इनरव्हील क्लब, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने वेशभूषा स्पर्धा व ग्रुप डान्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. १४ मार्च रोजी दुपारी १२.३० वाजता अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे होणार आहे.

वेशभूषा स्पर्धेसाठी रामायण व महाभारतातील पात्रांची वेशभूषा करावयाची आहे. स्पर्धकांनी आपण साकारत असलेल्या पात्राचे नाव सांगून त्या पात्राचे सादरीकरण करायचे आहे. यासाठी स्पर्धकांना २ ते ३ मिनिटांचा वेळ देण्यात येणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम बक्षीस ११०० रुपये, द्वितीय बक्षीस ९०० रुपये व तृतीय बक्षीस ७०० रुपये देण्यात येणार आहेत. स्पर्धेचा निकाल परीक्षकांच्या निर्णयानुसार अंतिम राहील.

ही स्पर्धा विवाहित महिलांसाठी असून नावनोंदणी विनाशुल्क आहे. नावनोंदणीची अंतिम तारीख दि. १२ मार्च असून नावनोंदणीसाठी इच्छुकांनी सौ. रत्नप्रभा किसन माळी (९३५९२५६६४१), सौ. मंगल लाटणे (९४२१०४३३२२), मंगल पाटील (७५५९१४२२६५) व उज्वला लेंडवे (९५५२९०७६९९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ।। शोध ।।

किती धुंडाळल्या वाटा
नाही लागलाच ठाव
सजना तुझ्याचसाठी
किती सोशियले घाव
विचारू तरी कुणा ?
सप्तसुरांना.....
दाही दिशांना....
की, वादळवाऱ्यांना ?
जिथे जिथे पाहते
होतो तुझाच रे भास
श्वासामध्ये येतो माझ्या
फक्त तुझाच सुवास
नाही थांबणार शोध
आहे युगानुयुगाचा
फेरा हा चाले आता
माझ्या जन्म - मरणाचा.

**विजय नारायण जावीर गुरुजी**
९४२१०३२७८५

# सांगोला नगरपरिषदेचा जागतिक महिला दिन उत्साहात; पाककला व ग्रुप डान्स स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




सांगोला (प्रतिनिधी):- जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सांगोला नगरपरिषदेच्या वतीने महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शनिवारी (दि. ७ मार्च २०२६) सकाळी पाककला स्पर्धा आणि दुपारी ग्रुप डान्स स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या कार्यक्रमाला शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर हरीभाऊ गवळी, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. छाया सुर्यकांत मेटकरी तसेच लोकनियुक्त नगराध्यक्ष श्री. आनंदा यशोदा गोरख माने व सर्व महिला नगरसेविका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. व त्यानंतर बोलताना मुख्याधिकारी डॉ. गवळी यांनी सांगितले की, महिला दिनाच्या निमित्ताने नगरपरिषदेच्या माध्यमातून दरवर्षी पाककला, डान्स स्पर्धा तसेच 'होम मिनिस्टर'सारखे उपक्रम आयोजित केले जातात. अशा कार्यक्रमांमुळे महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळते आणि महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

सकाळी ११ ते १२ या वेळेत पार पडलेल्या पाककला स्पर्धेत मूग/हुलगे यापासून चविष्ट, पौष्टिक आणि रुचकर पदार्थ बनविण्याची अट ठेवण्यात आली होती. पदार्थाची चव, पौष्टिकता, सजावट, स्वच्छता आणि मांडणी या निकषांवर विजेत्यांची निवड करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्पर्धकांनी आपल्या पदार्थाचे नाव, घटक पदार्थ, कृती व पौष्टिक फायदे कागदावर लिहून सादर केले. पाककला स्पर्धेचे परीक्षण सौ. यादव मॅडम यांनी केले. स्पर्धेसाठी महिलांनी आकर्षक आणि पौष्टिक पदार्थ सादर करून आपली पाककला कौशल्ये दाखवून दिली.

यानंतर दुपारी २ वाजता ग्रुप डान्स स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत आठ महिला गटांनी सहभाग घेतला. प्रत्येक गटात सुमारे आठ ते दहा महिलांचा समावेश होता. सर्व गटांनी उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

या ग्रुप डान्स स्पर्धेसाठी पतंगे , राऊत आणि कस्तुरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब आणि सामाजिक संदेश देणाऱ्या नृत्य सादरीकरणांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरपरिषदेच्या पाटील , निकम आणि कोरे यांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, ९ मार्च २०२६ रोजी 'होम मिनिस्टर' स्पर्धा आयोजित करण्यात आली असून त्याच दिवशी पाककला, डान्स आणि होम मिनिस्टर स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

**डॉ.बोराडे हॉस्पिटल**
**कडलास रोड, सांगोला.**
२४ तास अत्यावश्यक सेवा
मोबा: ९६३७२१८०९०
हृदयविकार, रक्तदाब, मधुमेह, विषबाधा, पॅरेलेसिस फिट्स, लिव्हर, किडनीचे आजार या व अशा आजारावर निदान व उपचार
डॉ. प्रमोद धर्मराज बोराडे. MBBS D.N.B (मेडिसीन)
डॉ. सौ. प्राजक्ता प्रमोद बोराडे B.A.MS DRCH (स्त्री रोग तज्ञ)
आपल्या हक्काचं हॉस्पिटल डॉ.बोराडे हॉस्पिटल

# फॅबटेक मध्ये नक्षत्र २के२६ चे शानदार उदघाटन

सांगोला: प्रतिनिधी):- फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात सालाबादप्रमाणे याहीवर्षी शुक्रवार दिनांक ६ मार्च २०२६ रोजी नक्षत्र २के२६ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. संजय आदाटे, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर आदींच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी, सांघिक भावना निर्माण करण्यासाठी, संस्कृती आणि परंपरा जतन करण्यासाठी व त्याचबरोबर शैक्षणिक वर्षातील यशाचा आनंद साजरा करण्यासाठी फॅबटेक इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा आयोजित केला जातो. हा सोहळा म्हणजे केवळ एक मनोरंजन नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि फॅबटेक महाविद्यालयाच्या सकारात्मक वातावरणासाठी एक महत्त्वाचा उपक्रम असतो.

उपक्रमात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी सहभागी होर असतात. नक्षत्र २के२६ अंतर्गत आर्ट गॅलरीचे उद्घाटन, फूड स्टॉल ॲण्ड फनी गेम्स, ट्विनिंग डे, मिस मॅच/ग्रुप डे, बॉलीवूड डे आदी कलाप्रकारात विद्यार्थी अन् विद्यार्थिनीनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.




कार्यक्रमाचे प्रतिनिधी प्रा. राहूल पाटील तसेच विद्यार्थी प्रतिनिधी अथर्व जाधव आणि कुमुद भडकवाड यांनी काम पाहिले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेत आहेत.

**भाड्याने देणे आहे.**
सांगोला शहरातील (जि.सोलापूर) कडलास नाका- जत रोड या मध्यवर्ती ठिकाणी व चौकातील अशी प्राईम लोकेशन असलेली 3500 स्के.फुट आरसीसी बांधकाम असलेली जागा हॉस्पीटल साठी वापर तत्वावर भाड्याने देणे आहे.
वैशिष्ट्ये
* स्वतंत्र ऑपरेशन थिएटर * स्पेशल रुम
* सेमी स्पेशल रुम * जनरल वॉर्ड
* मेडिकल स्टोअर्स व लॅब साठी स्वतंत्र जागा
* ओपन टेरेस, भरपूर जागा
* २४ तास गरम व थंड पाण्याची सोय * पार्किंग सुविधा
* तसेच रेडी प्रोजेशन असल्यामुळे फर्निचर साठी जादा खर्च नाही
* गेल्या १५ वर्षापासून या जागेत हॉस्पीटल असल्यामुळे पेंशट फ्लो
संपर्क:
7756939793, 9921398899

**अजिंक्यतारा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सांगोला जि. सोलापूर**
खालील प्रमाणे पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र | पद | पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | क्लार्क | बीकॉम/ एम.कॉम (अनुभवास प्राधान्य ) | २ |
| २ | सेवक | १० वी पास (अनुभवास प्राधान्य ) | १ |

पत्ता: अजिंक्य प्लाझा, वासूद रोड सांगोला
संपर्क: 9423327234, 8888570234

**स्कीन क्लिनिक**
डॉ.करमुडे यु.एम. एम.बी.बी.एस.एम.डी.पुणे (त्वचारोग तज्ञ)
मो.७०८३३३४४३४, ९९७५७०७७२७
सेवानिवृत्त प्रमुख डॉक्टर, त्वचारोग विभाग, ससून हॉस्पिटल, पुणे
ठिकाण:- सांगोला, म.फुले चौक (पुतळ्याजवळ), महात्मा फुले संकुल, तळमजला, बी-१ (नवीन इमारत)

डॉ.करमुडे यु.एम.
वेळ-दररोज दुपारी १२ ते सांय.५ (शनिवारी बंद)

# महिला सक्षमीकरण सप्ताह अंतर्गत जिल्हा परिषद शाळा मेडशिंगी येथे विविध कार्यक्रम संपन्न



मेडशिंगी(वार्ताहर):- मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांचे संकल्पनेतून व गटविकास अधिकारी श्री उमेशचंद्र कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत दिनांक २ मार्च ते ८ मार्च या कालावधीत जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.या मध्ये आरोग्य शिक्षण ग्रामपंचायत व बालकल्याण विभागास वेगवेगळे उपक्रम देणेत आले आहेत शिक्षण विभागाला दिलेल्या उपक्रमामध्ये जिल्हा परिषद शाळा मेडशिंगी चे केंद्रीय मुख्याध्यापक श्री राजेश गडहिरे सर यांनी अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी करुन आपले कर्तव्य प्रभावी पणे पार पाडून आपल्या कार्याची चुणूक दाखवली

सदर उपक्रमाअंतर्गत दिनांक २ मार्च रोजी सप्ताहाचे उद्घाटन चांगल्या प्रकारे केले.गावातील बहुसंख्य महिला यावेळी उपस्थित होत्या. दिनांक ६ मार्च रोजी महिलांचे आरोग्य शिक्षण पोषण व आहार तसेच महिलांसाठी असणारे कायदे या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.सदर मार्गदर्शनासाठी श्रीनंद हास्पिटलचे बालरोगतज्ज्ञ डॉ जानकर यांचे सहकार्यातून श्री विजय मोरे,पूजा मोरे. रुपाली शिर्के.सुरेखा शिंदे. अभिजित फाटे.अमोल फाटे,ललिता वाघमारे, सुषमा होवाळ ,प्राथमिक आरोग्य केंद्र मेडशिंगी येथील श्री कोळी अण्णा ,श्रीमती काटे,श्री गोडसे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.यावेळी रांगोळी,लिंबू चमचा, पोते उडी, संगित खुर्ची अशा विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या, यामध्ये बहुसंख्य महिला पालक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. रांगोळी स्पर्धा प्रकारात प्रथम क्रमांक शितल शिंदे यांनी तर व्दितीय क्रमांक आशा कसबे व तृतीय क्रमांक अमृता सरगर यांनी मिळवला. संगीत खुर्ची प्रकारात प्रथम क्रमांक सोनाली जाधव यांनी तर व्दितीय क्रमांक विद्या मोरे व तृतीय क्रमांक प्रियंका कसबे यांनी मिळवला. लिंबू चमचा प्रकारात प्रथम क्रमांक सोनाली कसबे व्दितीय क्रमांक विद्या मोरे तृतीय क्रमांक मंजुषा कांबळे यांनी पटकावला तर पोते उडी प्रकारात सोनाली जाधव यांनी प्रथम तर आशा कसबे यांनी व्दितीय क्रमांक व सारिका बंडगर यांनी तृतीय क्रमांक मिळविला. सदर प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विनोद कसबे,सांगोला बीआरसी चे श्री संभूदेव लवटे ,शाळेचे मुख्याध्यापक श्री राजेश गडहिरे,अंगणवाडी सेविका श्रीमती सुनीता कांबळे,श्रीमती संगीता वाघमारे,श्रीमती शिंदे,श्रीमती कसबे तसेच धनश्री बंडगर, अश्विनी वाघमोडे,अक्षता वाघमोडे,मानसी राऊत, अमृता ढोणे यांचे सह बहुसंख्य महिला भगिनी उपस्थित होत्या

सदरच्या सर्व स्पर्धांचे परिक्षक व पंच म्हणून श्रीमती सुनीता कांबळे,श्रीमती संगीता वाघमारे,श्रीमती शिंदे,श्रीमती कसबे व वाळके आवताडे वस्ती शाळेतील उपशिक्षिका श्रीमती सरला शिर्के यांनी काम पाहिले.आभार शाळेचे मुख्याध्यापक श्री राजेश गडहिरे सर यांनी मानले.

# सह्याद्री फार्मसीच्या डॉ.सुनयना माळी या बेस्ट रिव्हिव्हर म्हणून सन्मानित

सांगोला:-सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी,मेथवडे कॉलेजच्या डॉ.सुनयना माळी यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रकाशनासाठी बेस्ट रिव्हिव्हर म्हणून इंनोवेटिव्ह पब्लिकेशन, नवी दिल्ली यांनी प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

डॉ.सुनयना माळी यांनी आफ्रिकन जर्नल ऑफ मेडिसिन अँड फार्मा रिसर्च व करंट ट्रेंड्स इन फार्मसी अँड फार्मासुटिकल केमिस्ट्री या दोन जर्नलचे विविध आर्टिकल्स रिव्हिव्ह केले. या लेखांच्या उच्च दर्जाच्या, विद्वत्तापूर्ण आणि वेळेवर पुनरावलोकनातील त्यांच्या उत्कृष्ट व उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले.

या त्यांच्या यशाचे संस्थेच्या अध्यक्षा अनिता दिलीपकुमार इंगवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी कौतुक करून त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# नाझरे येथे विजेचे स्मार्ट मीटर बसविण्यास ग्रामस्थाचा, ग्रामपंचायतीचा तीव्र विरोध..



नाझरे(प्रतिनिधी):- नाझरे ता. सांगोला येथे सध्या महावितरण कार्यालयाकडून स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम सुरू आहे.परंतु स्मार्ट मीटर मधून ग्राहक गोंडस नावाप्रमाणे स्मार्ट न होता अधिक चिंतेत आहे व या मीटर मधून अधिक वीज बिल येत असल्याची अनेकांची तक्रार आहे व ग्रामस्थ व ग्रामपंचायतीचा यास विरोध आहे.तरी मीटर बसू नये व याबाबतचे निवेदन नाझरे महावितरण कार्यालयास देण्यात आले.

स्मार्ट मीटर एका कंपनीमार्फत बसविले जात असून हे मीटर वेगाने फिरत आहे व भविष्यात रिचार्ज सिस्टीमचे होणार आहे तरी महावितरण कार्यालयाने जबरदस्तीने हे मीटर बसवू नयेत असे सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर विजय सरगर यांनी सांगितले. तर स्मार्ट मीटर बसवण्यास सर्व ग्रामस्थांचा विरोध आहे व तसा ठराव ग्रामपंचायत झाला आहे तरीही मीटर बसविल्यास तीव्र आंदोलन करू असे सामाजिक कार्यकर्ते दादासो हरिहर यांनी सांगितले.

**स्मार्ट वीज मीटर लावणे बंधनकारक नाही.**

वीज कायदा २००३ च्या कलम ५५ नुसार स्मार्ट विविध मीटर लावणे बंधनकारक नाही व भविष्यातील लूटमार थांबविण्यासाठी जनतेने या तीव्र विरोध करावा व हे मीटर बसविणे अनिवार्य नाही.

**-रविराज शेटे नाझरे**

## दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि; पंढरपूर
## नोटीस

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार अंकुश निवृत्ती बंडगर रा.जवळा ता.सांगोला यांचे नावावर सेव्हिंग खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसा पैकी त्यांचा अर्जदार -शोभा अंकुश बंडगर - पत्नी यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या सेव्हिंग खात्यास अर्जदार शोभा अंकुश बंडगर यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे !

पंढरपूर — ता. ८ मार्च २०२६

सही/मुख्य कार्यकारी अधिकारी
दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि. पंढरपूर

# मेथवडे माळी वस्ती प्राथमिक शाळेत महिला दिनानिमित्त महिला सप्ताह कार्यक्रम



मेथवडे:- जि .प. प्रा शाळा माळी वस्ती (मेथवडे) येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिला सप्ताह कार्यक्रम मोठ्या संख्येने खूप छान पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रियंका ताठे या मॅडम उपस्थित होत्या. सूत्रसंचालन शेंडे मॅडम यांनी केले. उपस्थित शिक्षक सांगोलचे बुरांडे सर व शेंडे मॅडम व कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर आंबेडकर शेती विकास संशोधन संस्था मधील संविधान संवादक स्वाती वाघमारे उपस्थित होत्या.वस्तीवरील रूपाली कोळी , नूतन चौधरी (अंगणवाडी सेविका) सीमा कांबळे,ऋतुजा सुरवसे, रोहिणी कांबळे,मीना कांबळे,भाग्यश्री माळी, पल्लवी माळी, अश्विनी माळी, रोहिणी सूर्यवंशी, राणी पवार, काजल पवार, स्वप्नाली पवार, आश्विनी पवार, सुनिता माळी, सारिका पवार, सुजाता अनंतकवली ,गोकुळा नवले,सोनाली घोडके ,सुजाता कांबळे, रेणुका माळी, सविता माळी, मालाश्री साळुंखे, राणी अनंतकवली, सुनंदा सूर्यवंशी, मनीषा खंडागळे या सर्व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

संविधान संवादक स्वाती वाघमारे यांनी महिलांना आरोग्य विषय घ्यावयाची काळजी व बालविवाह, महिला व मुले यांच्यातील संवाद अधिक प्रकट व्हावा यासाठी मार्गदर्शन केले व शासकीय योजनांचा लाभ याबद्दलही माहिती सांगितली. रेशन कार्ड समस्या याबद्दल माहिती सांगितली. घर दोघांचे हा उपक्रम राबविण्याबाबत माहिती दिली व वेगवेगळ्या खेळाच्या माध्यमातून महिलांना स्वातंत्र्य या मूल्यावर माहिती सांगितली. व महिलांना जागतिक महिला दिन याबद्दल शुभेच्छा दिल्या.

नूतन जगताप यांनी मुलांच्या आरोग्याची काळजी कशा पद्धतीने घ्यायची यावर महिलांना मार्गदर्शन केले नंतर रोहिणी सूर्यवंशी यांनी महिलांना स्वतःचा व्यवसाय हा कसा उभा करायचा व स्वतः आत्मनिर्भर कसे बनायचे यावर मार्गदर्शन केले. रेणुका माळी यांनी महिलांना आपली स्वतःची ओळख ही कशी असावी याबद्दल मार्गदर्शन केले.सिताराम बुरांडे सर यांनी उपस्थित महिला व सर्व मान्यवरांचे अभिनंदन व्यक्त केले व आभार मानले

**दक्षता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, सांगोला**
**पाहीजेत**

| अ.क्र. | पद | संख्या |
|---|---|---|
| 1. | नर्सिंग स्टाफ GNM/ANM | 10 |
| 2. | सिक्युरिटी / वॉर्ड बॉय | 5 |
| 3. | सफाई कामगार (मावशी) | 5 |
| 4. | कॉम्प्युटर ऑपरेटर (अनुभवी) | 2 |
| 5. | मेडीकल फार्मासिस्ट | 2 |
| 6. | लॅब टेक्निशियन | 2 |
| 7. | अकॉटंट (B.Com) | 2 |
| 8. | RMO (doctor) MBBS BAMS BHMS houseman | 6 |

संपर्क
9049490251 / 8983453867/ 7776961213




## भारतीय स्त्री शक्ती-सांगोला संस्थेला राज्य महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्कार



सांगोला(प्रतिनिधी):- जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने मुंबई येथील रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात भारतीय स्त्री शक्ती - सांगोला (सोलापूर जिल्हा ) या संस्थेला उत्कृष्ट समाजकार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मा. श्रीमती सुनेत्रा ताई पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.या प्रसंगी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. श्रीमती रुपालीताई चाकणकर, मा. आमदार मनीषा कायंदे, रवींद्र नाट्य मंदिरच्या संचालिका मृणाल जोगळेकर, तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सचिव नंदिनी आवडे उपस्थित होते.

भारतीय स्त्री शक्ती - सांगोला ही अराजकीय, स्वयंसेवी आणि राष्ट्रीय स्तरावरील महिला संघटना असून तिची सांगोला (सोलापूर जिल्हा) शाखा १ जून २००४ पासून ग्रामीण व दुष्काळग्रस्त भागात महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. संस्थेची मूळ स्थापना सन १९८८ मध्ये झाली असून सांगोला तालुका व सोलापूर जिल्ह्यातील महिलांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. संस्थेच्या माध्यमातून शिक्षण व कौशल्य विकास, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य, आत्मसन्मान वृद्धी, आर्थिक आत्मनिर्भरता आणि स्त्री-पुरुष समानता या पंचसूत्री तत्त्वांवर आधारित कार्य केले जाते. संस्थेचा प्रमुख उपक्रम म्हणजे मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्र - सांगोला, १ जून २००४ पासून कार्यरत आहे.संस्थेमार्फत महिला आरोग्य जनजागृती अभियान, तपासणी शिबिरे, किशोरवयीन मुलींसाठी कॅन्सर प्रतिबंधक लसीकरणाबाबत जनजागृती, मासिक पाळी स्वच्छता मार्गदर्शन तसेच ग्रामीण आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात.किशोर-किशोरी विकास कार्यक्रम अंतर्गत शाळा व महाविद्यालयांमध्ये भावनिक व मानसिक आरोग्य, सायबर सुरक्षितता, लैंगिक शिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास या विषयांवर मार्गदर्शन केले जाते.राष्ट्रीय महिला आयोगाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेला तेरे मेरे सपने विवाहपूर्व संवाद प्रकल्प हा संस्थेचा विशेष उपक्रम असून संस्थेमार्फत बालविवाह प्रतिबंध, महिलांवरील अन्यायाविरुद्ध निवेदने, ग्रामस्तरीय महिला जनजागृती तसेच पोलीस प्रशासन व ग्रामपंचायत यांच्याशी समन्वय साधून सामाजिक हस्तक्षेप करण्यात येतो.

संस्थेच्या या सातत्यपूर्ण, पारदर्शक व परिणामकारक कार्याची दखल घेऊन जागतिक महिला दिन २०२६ निमित्त महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने संस्थेला हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केला. हा पुरस्कार भारतीय स्त्री शक्ती - सांगोला शाखेच्या अध्यक्षा ॲड . राजेश्वरी केदार, सचिवा वसुंधरा कुलकर्णी आणि सहसचिवा डॉ. चित्रा जांभळे यांनी स्वीकारला.भारतीय स्त्री शक्ती - सांगोला शाखेच्या अध्यक्षा ॲड. राजेश्वरी केदार, उपाध्यक्ष मनीषा भोसेकर, सचिवा वसुंधरा कुलकर्णी, कोषाध्यक्ष शालिनी कुलकर्णी आणि सहसचिवा डॉ. चित्रा जांभळे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे कार्य सुरू असून या सन्मानामुळे ग्रामीण महिला सक्षमीकरणाच्या कार्याला अधिक प्रेरणा मिळणार असल्याची भावना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली

## फॅबटेक पॉलिटेक्निक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत विजयी



सांगोला(प्रतिनिधी):-फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी बीड (माजलगाव) येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय मुलींच्या हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करून महाविद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला असल्याची माहिती प्राचार्य तानाजी बुरूंगले यांनी दिली. आयडीईएसएसए अंतर्गत राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील १४ झोनमधुन १४ संघानी सहभाग घेतला होता. राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत सांगोला येथील फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक महाविद्यालयातील विद्यार्थिनीनी महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला असुन फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींनी हॉलीबॉल स्पर्धेत आपल्या कौशल्याची छाप पाडून उल्लेखनीय कामगिरी करून आत्मविश्वासाच्या जोरावर विजय प्राप्त केला आहे.या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. अमित रूपनर यांच्या हस्ते विजयी हॉलीबॉल संघाला सन्मानचिन्ह देऊन अभिनंदन केले तसेच फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती नीलवर्णा बिरासाहेब रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, प्राचार्य तानाजी बुरूंगले, क्रीडा शिक्षक प्रा. बिरा वगरे, प्रा. सविता वाघमोडे आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सांगोला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले प्रत्यक्ष 'बँकिंग' विश्व



सांगोला(प्रतिनिधी):-पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्यासाठी सांगोला महाविद्यालयातील मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने नुकतीच दिनांक ६ मार्च २०२६ रोजी IndusInd बँक सांगोला शाखेला अभ्यास भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बँकेचे प्रत्यक्ष कामकाज आणि डिजिटल क्रांतीची माहिती जाणून घेतली.

शाखा व्यवस्थापक रविकिरण सुरवसे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यांनी बँकेत खाते उघडण्यापासून ते कर्ज मंजुरीपर्यंतच्या सर्व प्रक्रियांची माहिती दिली.

रोख व्यवहार, चेक क्लिअरन्स आणि लॉकर सुविधा कशा प्रकारे चालतात, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. उपशाखा व्यवस्थापक अमृत देशमुख यांनी सध्याच्या काळात सायबर सुरक्षेचे महत्त्व वाढत असल्याने, बँकेच्या वतीने विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल व्यवहारांबाबत मार्गदर्शन केले. मोबाईल बँकिंग वापरताना कोणती काळजी घ्यावी, यावर विशेष चर्चा करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी अर्थव्यवस्थेतील बँकेची भूमिका, व्याजाचे दर यांसारख्या तांत्रिक विषयांवर व्यवस्थापकांशी संवाद साधला. बँकिंग क्षेत्रात करिअरच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, याबद्दलही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले. यावेळी अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. वर्गात शिकलेले बँकिंगचे नियम प्रत्यक्षात कसे राबवले जातात, हे विद्यार्थ्यांना जवळून पाहायला मिळाले. ही भेट आमच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरली असा सूर विद्यार्थ्यांमधून ऐकावयास मिळाला. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. डी. वेदपाठक, प्रा. सौ.एस.एस.भुंजे, व प्रा.पी. डी. गोडसे यांनी विशेष प्रयत्न केले.

महाविद्यालयात उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य, डॉ.सुरेश भोसले व आय. क्यू. ए. सी.प्रमुख डॉ.आर.जी.पवार यांचे सहकार्य लाभले. तसेच सर्व संस्था पदाधिकारी व सर्व संस्था सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

## लिटल मिलेनियम प्रीस्कूल, सांगोला येथे महिला दिन उत्साहात साजरा



सांगोला:-सप्तम सोशल फाउंडेशन संचलित लिटल मिलेनियम प्रीस्कूल, सांगोला येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिलांच्या सन्मानार्थ आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी सौ.राणीताई आनंदा माने (नगरसेविका,सांगोले नगरपरिषद सांगोले) यांची प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती लाभली तसेच सौ.छायाताई मेटकरी (सभापती, महिला व बालकल्याण समिती, नगरपरिषद सांगोला), सौ.आशादेवी यावलकर (नगरसेविका, सांगोले नगरपरिषद सांगोले)आणि सौ.सीमाताई सरगर (नगरसेविका,सांगोले नगरपरिषद सांगोले) यांची प्रमुख उपस्थिती लाभली आणि कार्यक्रमाची शोभा वाढली.

कार्यक्रमामध्ये महिलांसाठी विविध मजेदार खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पेपर अँड स्ट्रॉ गेम, पास द बलून, म्युझिकल चेअर आणि मेकिंग द पिरॅमिड गेम या खेळांचा समावेश होता. सर्व महिलांनी या खेळांमध्ये आनंदाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे नियोजन व सजावट कॅम्पस इन्चार्ज पूजा पतंगे, स्वाती मस्के, पल्लवी पांढरे, मयुरी फुले आणि आरझू शेख यांनी केले.

## शिवणे विद्यालयात महिला सक्षमीकरण सप्ताह निमित्त कार्यक्रमाचे आयोजन



शिवणे(वार्ताहर):-शिवणे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महिला सक्षमीकरण सप्ताह निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते.त्या कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीमाईच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी प्रथम विद्यालयातील माहेश्वरी मेटकरी, प्रतिभा सरगर, स्नेहल इंगोले, गौरी चळेकर या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे आरोग्य सेविका चिमुताई घाडगे यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थिनींना अनेक बाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शिवणे गावातील तलाठी कल्लोळी मॅडम, आरोग्य सेवक राहुल देवडकर, समुदाय आरोग्य अधिकारी संदीप मंगळूर, पोस्टमन घाडगे मॅडम, आशावर्कर सारिका सावंत, महादेवी वाळके, श्रीमती मिराबाई देशमुख मॅडम, पालक भगिनी व विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवणे विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. दिगंबर कुंभार सर होत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती गायत्री घाडगे मॅडम यांनी केले तर श्रीमती सातपुते मॅडम यांनी आभार मानले.

## न्यू इंग्लिश स्कूल मध्ये महिला सक्षमीकरण कार्यक्रम संपन्न



सांगोला(वार्ताहर):-सांगोला शहरातील नामांकित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनि कॉलेज मध्ये महिला सक्षमीकरण सप्ताह अंतर्गत किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुण्या डॉ. आशा मिसाळ,संस्था सदस्य डॉ.अशोकराव शिंदे,न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनि कॉलेज चे प्राचार्य प्रा.केशव माने,उपमुख्याध्यापिका वैशाली घोडके, पर्यवेक्षक तात्यासाहेब इमडे, सांस्कृतिक प्रमुख स्मिता इंगोले,प्रा.इंदिरा येडगे(ज्युनि),गीता गुळमिरे,प्रा.जया पाटील व अनुराधा लिगाडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्येची देवता सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ.आशा मिसाळ आपल्या मनोगतात म्हणाल्या की,किशोरावस्था ही जीवनातील एक सुंदर आणि बदल घडणारी अवस्था आहे, ज्यात शरीर आणि मन दोन्ही विकसित होतात. पण या अवस्थेत योग्य पोषण आणि निरोगी सवयी नसल्यास आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. किशोरवयीन मुलींसाठी पोषण म्हणजे फक्त जेवण नाही, तर शरीराच्या विकासाची पायाभूत दगड आहे. पोषण फक्त आहारावर थांबत नाही तर तो जीवनशैलीशी जोडलेला आहे.संतुलित व्यायाम,पुरेशी झोप,मानसिक आरोग्य व स्वच्छता ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे.यानंतर आपल्या अध्यक्षीय मनोगतात उपमुख्याध्यापिका वैशाली घोडके यांनी सांगितले की,किशोरावस्था ही जीवनातील एक क्रांतिकारी काळ आहे.ज्यात शरीराच्या विकासासोबतच मानसिक आणि भावनिक बदल घडतात.या वयात योग्य पोषणाची कमतरता अनेक समस्या जन्माला घालते जसे की ॲनिमिया,हाडांची कमजोरी किंवा ऊर्जेचा अभाव आणि महिलांसाठी तर हे आणखी गंभीर आहे.कारण आम्ही कुटुंबाची धुरा वाहतो,नवीन पिढी घडवतो. आजच्या या चर्चेतून निश्चितच अनेक उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.सूत्रसंचालन दिप्ती कुलकर्णी यांनी केले तर आभार गीता गुळमिरे यांनी मानले.




**हॉल भाड्याने देणे आहे**

सांगोला शहरातील वासुद रोड वरील जी.के.जिम समोर पाटील अपार्टमेंट मध्ये १७०० चौ.फू. हॉल भाड्याने देणे आहे

(सर्व सोयीने युक्त हॉल) बँक, पतसंस्था, ऑफिस, एजन्सी, क्लासेस, गोडाऊन इत्यादींसाठी उपयुक्त

मो.8208513358/8007502685

**माऊली लॅबोरेटरी**

शुगर (३ महिन्याची अ‍ॅव्हरेज शुगर), पेशी, लिव्हर, किडनी, कॅलशिअम, थायरॉईड, व्हिटॅमीन, थुंकी, युरीन व इतर टेस्ट करुन त्वरीत रिपोर्ट दिले जातील.

* २४ तास सेवा * होम व्हिजीट अ‍ॅव्हेलेबल

पत्ता: पाटील हॉस्पिटल शेजारी, टायटन शोरुमसमोर, भोपळे रोड, सांगोला

संपर्क: श्री.नवनाथ सुरेश शेळके (बी.एस्सी.केमिस्ट्री) एडीएमएलटी

मो.9689589264

**डॉ.देवकते यांचे**

मातोश्री पद्मिनी हॉस्पिटल

स्थलांतर

हाडांचे डॉ.गावडे सद्गुरु हॉस्पिटल मागे, अलराईन नगर, मोहर हॉटेल समोर स्थलांतर झाले आहे

हॉस्पिटलमध्ये स्टाफ भरणे आहे

पद: सिस्टर-२ | वार्ड बॉय-२ | मावशी - २

मोबा.7058348370

TATA POWER SOLAROOF

भारताची क्र. १ ची सोलर रूफटॉप कंपनी*

TATA

अधिकृत चॅनल पार्टनर: सनर्जी सोलर

संपर्क : 9022908009 / 9075929191 8009300996. मार्केट यार्ड समोर, पंढरपूर रोड, सांगोला

हे ऑन तर क्वालिटी लाइफलॉंग